International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar–April- 2022

# महाराष्ट्राची मानव विकास स्थिती

**डॉ. कदम अरविंद वसंतराव**
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव
ई-मेल - kdmarvind38@gmail.com

**गोषवारा (Abstract)**

सन 1990 नंतर विकासासाठी आर्थिक घटकाशिवाय सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध घटकांचा विचार केला जातो. म्हणूनच मानव विकास ही बहुआयामी संकल्पना आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. मेहबुब उल हक्क व नोबेल पारितोषिक विजेते प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनी मानव विकास या घटकांकडे जगाचे लक्ष वेधून घेतले. मानव विकास ही बहुआयामी संकल्पना आहे. संयुक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रम यांच्या जागतिक मानव विकास अहवाल 1997 नुसार, "मानव विकास ही अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे सामान्य लोकांच्या निवडीचा विस्तार करून कल्याणाची उच्च पातळी गाठली जाऊ शकते." चालू किंवा अपूर्ण प्रक्रिया, बहुआयामी संकल्पना, आंतरविद्याशाखीय आणि कृतियुक्त प्रक्रिया ही मानव विकास संकल्पनेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. मानव विकास निर्देशांक हा स्थूलमानाने आयुर्मान, ज्ञानप्राप्ती व चांगले राहणीमान या तीन सामाजिक घटकांची सरासरी होय. लोकांचे सरासरी आयुर्मान, शिक्षणाचा कालावधी / प्रौढ साक्षरतेचे प्रमाण, संयुक्त पटनोंदणी व दरडोई उत्पन्न इत्यादी मानकांना समान महत्त्व देऊन मानव विकास निर्देशांक काढला जातो. या निर्देशांकाचे एकूण मूल्य 0 ते 1 च्या दरम्यान निश्चित केलेले आहे. निर्देशांक 1 असेल तर तो सर्वोत्कृष्ट मानला जातो. देशांची क्रमवारी 1 पासून 0 पर्यंत निर्देशांक मुल्यानुसार लावली जाते. मानव विकास निर्देशांक काढण्यासाठी प्रत्येक उपनिर्देशांकासाठी कमाल व किमान असे मूल्य निश्चित करण्यात आले आहे. हे मूल्य 0 ते 100 मध्ये मोजले जाते. या तिन्ही उपनिर्देशांकांना समान भार (महत्त्व) देण्यात येतो. मानव विकास निर्देशांक म्हणजे सरासरी आयुर्मान निर्देशांक, शिक्षणाची प्राप्ती निर्देशांक व जीवनमान निर्देशांक या तिन्हीची समभारीत सरासरी होय.

**बीजसंज्ञा (Keywords)-** मानवविकास निर्देशांक, सरासरी आयुर्मान, संयुक्त पटनोंदणी प्रमाण, वास्तव दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन (डॉलर).

**प्रस्तावनाः-** सन 1990 पूर्वी विकासाचे मोजमाप करण्यासाठी आर्थिक विकास महत्त्वाचा मानला जात होता. त्या अनुषंगाने राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न या संकल्पना महत्त्वाच्या होत्या पण 1990 नंतर डॉ. मेहबूब उल हक्क व नोबेल पारितोषिक विजेते प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी मानव विकास ही बहुआयामी संकल्पना विकसित केली. मानव विकासाच्या स्तरानुसार जगातील देशांचे क्रमांक ठरविण्यासाठी जो निर्देशांक वापरला जातो त्याला मानव विकास निर्देशांक म्हणतात. लोकांचे आरोग्य, शिक्षणाचा कालावधी, साक्षरतेचे प्रमाण व दरडोई उत्पन्न इत्यादींच्या मूल्यात होणा-या बदलाचे मापन करण्यासाठी जी गणितीय पद्धती उपयोगात आणली जाते, तिला मानव विकास निर्देशांक म्हणतात.

**उद्देशः-** मानव विकास निर्देशांकानुसार महाराष्ट्र राज्याची स्थिती जाणून घेणे.

**माहितीस्त्रोत व संशोधन पद्धतीः-**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी आवश्यक माहिती द्वितीयक स्वरूपाची आहे. त्यासाठी ग्रंथ, शोधनिबंध व इंटरनेटद्वारे उपलब्ध माहितीचा उपयोग केला आहे. तसेच विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी महाराष्ट्र हा प्रदेश निवडलेला आहे.

**मानव निर्देशांकाचे मानके व मूल्य**

| घटक | माप / मोजणी | किमान मूल्य | कमाल मूल्य |
|---|---|---|---|
| दीर्घ व स्वास्थ्यपूर्ण जीवन | सरासरी आयुर्मान (LEI) | 25 वर्षे | 85 वर्षे |
| ज्ञान प्राप्ती | साक्षरता प्रमाण (ALR) | 0 टक्के | 100 टक्के |
| | संयुक्त पटनोंदणी प्रमाण (CER) | 0 टक्के | 100 टक्के |
| राहणीमानाचा दर्जा / जीवनमान | वास्तव दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन (डॉलर) (GDP ppp$) | 100 अमेरिकन डॉलर | 40000 अमेरिकन डॉलर |

**विषय विवेचनः-**

मानव विकास अहवाल 2015 नुसार जागतिक स्तरावर भारत मध्यम विकास गटात समाविष्ट असलेला देश आहे. भारताने 188 देशाच्या क्रमवारीत वरून 130 वा क्रमांक प्राप्त केला असून मानव विकास निर्देशांक 0.609 इतका आहे. 2020 नुसार क्रम 131 वा असून निर्देशांक 0.645 आहे. जो 2011 मध्ये 0.467 व 2001 मध्ये 0.387 इतका होता.

महाराष्ट्र राज्याच्या नियोजन विभागाने 2002 व 2012 मध्ये दोन स्वतंत्र अहवाल प्रकाशित केले आहेत. सन 2002 च्या अहवालात अर्भक मृत्यूदर, साक्षरता दर, सरासरी शिक्षणाचा कालावधी व दरडोई उत्पन्न इत्यादी मानकांचा आधार घेतला आहे. या अहवालात सदर मानकांचे अधिकतम व न्यूनतम मूल्य विचारात घेण्याऐवजी चांगला प्रतिसाद मूल्य, कमी प्रतिसाद मूल्य व जिल्हास्तरीय प्रतिसाद मूल्य विचारात घेतले होते. तसेच मानव विकास निर्देशांकाची गणना करताना मुंबईचा निर्देशांक हा एक (1) गृहीत धरण्यात आला आहे. महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2012 मध्ये मानव विकास निर्देशांक गणना करण्यासाठी अर्भक मृत्यूदर, साक्षरता दर, सकल पटनोंदणी दर व दरडोई जिल्ह्यांतर्गत उत्पन्न या निर्देशांकाचा आधार घेतला असून किमान व कमाल मूल्य विचारात घेतले आहे. सन 2001 व 2011 या कालावधीतील निर्देशांकाच्या स्थितीची तुलना करण्याच्या हेतूने या अहवालात दोन्ही वर्षाच्या निर्देशांकाची गणना करण्यात आली आहे. सन 2001 मध्ये महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक 0.666 इतका होता तर 2011 मध्ये 0.752 इतका होता.

### महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा मानव विकासा सापेक्ष स्तर, 2001 व 2011

| जिल्हा | मानव विकास निर्देशांक 2001 | सापेक्ष स्तर | जिल्हा | मानव विकास निर्देशांक 2001 | सापेक्ष स्तर |
|---|---|---|---|---|---|
| नंदूरबार | 0.513 | निम्न | नंदूरबार | 0.604 | निम्न |
| गडचिरोली | 0.538 | | गडचिरोली | 0.608 | |
| जालना | 0.554 | | वाशिम | 0.646 | |
| वाशिम | 0.554 | | हिंगोली | 0.648 | |
| नांदेड | 0.558 | | उस्मानाबाद | 0.649 | |
| हिंगोली | 0.561 | | नांदेड | 0.657 | |
| बुलडाणा | 0.567 | | जालना | 0.663 | |
| परभणी | 0.578 | | लातूर | 0.663 | |
| धुळे | 0.579 | | धुळे | 0.671 | |
| उस्मानाबाद | 0.588 | मध्यम | बीड | 0.678 | मध्यम |
| यवतमाळ | 0.592 | | परभणी | 0.683 | |
| लातूर | 0.595 | | बुलडाणा | 0.684 | |
| बीड | 0.606 | | यवतमाळ | 0.700 | |
| गोंदिया | 0.617 | | गोंदिया | 0.701 | |
| भंडारा | 0.623 | | अमरावती | 0.701 | |
| जळगाव | 0.624 | | भंडारा | 0.718 | |
| सोलापूर | 0.624 | | चंद्रपूर | 0.718 | |
| अहमदनगर | 0.626 | उच्च | अहमदनगर | 0.720 | उच्च |
| रत्नागिरी | 0.629 | | अकोला | 0.722 | |
| अकोला | 0.631 | | वर्धा | 0.723 | |
| अमरावती | 0.633 | | जळगाव | 0.723 | |
| वर्धा | 0.634 | | औरंगाबाद | 0.727 | |
| चंद्रपूर | 0.637 | | सोलापूर | 0.728 | |
| औरंगाबाद | 0.650 | | रत्नागिरी | 0.732 | |
| नाशिक | 0.652 | | सातारा | 0.742 | |
| सातारा | 0.661 | उच्चतम | सांगली | 0.742 | उच्चतम |
| सिंधूदूर्ग | 0.667 | | नाशिक | 0.746 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सांगली | 0.670 | | सिंधुदूर्ग | 0.753 | |
| कोल्हापूर | 0.678 | | रायगड | 0.759 | |
| नागपूर | 0.691 | | कोल्हापूर | 0.770 | |
| रायगड | 0.717 | | नागपूर | 0.786 | |
| ठाणे | 0.721 | | ठाणे | 0.800 | |
| पुणे | 0.722 | | पूणे | 0.814 | |
| मुंबई | 0.756 | | मुंबई | 0.841 | |
| **महाराष्ट्र** | **0.666** | | **महाराष्ट्र** | **0.752** | |

महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2012 हा प्रामुख्याने मानव विकासाचे विश्लेषण सर्वसमावेशक विकास या मध्यवर्ती कल्पनेच्या आधारे करतो. थोडक्यात समाजातील वंचित, शोषित, आर्थिकदृष्ट्या मागास गटातील लोकांना किती प्रमाणामध्ये विकासाच्या प्रवाहात सहभागी करण्यात आले आहे यावर प्रकाश टाकतो. या अहवालानुसार 2002 च्या तुलनेत 2011 मध्ये महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक वाढला असून विकासाच्या चारही निर्देशांकात सुधारणा झालेली आहे. मात्र निम्नतम व उच्चतम मानव विकास निर्देशांकामधील फरक हा 2001 व 2011 या कालावधीत सारखाच आहे. म्हणजेच विकसित व अविसकित जिल्ह्यातील दरी अजूनही तशीच आहे असे आढळते. नंदूरबार, गडचिरोली, जालना, हिंगोली व वाशिम या जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकामधील वाढ ही पूणे, मुंबई, ठाणे व कोल्हापूर या जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकामधील वाढीपेक्षा जास्त आहे.

**निष्कर्ष:-**

1) सर्वात कमी मानव विकास निर्देशांक नंदूरबार (0.604) व गडचिरोली (0.608) जिल्ह्यांचा आहे.

2) सर्वाधिक मानव विकास निर्देशांक मुंबई (0.841) जिल्ह्याचा आहे. त्यानंतर पुणे (0.814) जिल्ह्याचा क्रमांक लागतो.

3) सर्वाधिक मानव विकास निर्देशांक मुंबई (कोकण) प्रशासकीय विभागाचा असून त्यानंतर पुणे, नागपूर, नाशिक व अमरावती या प्रशासकीय विभागाचा क्रम लागतो.

4) सर्वात कमी मानव विकास निर्देशांक औरंगाबाद (मराठवाडा) विभागाचा आहे.

5) मराठवाड्यात सर्वात कमी मानव विकास निर्देशांक हिंगोली जिल्ह्याचा आहे.

**संदर्भसूची :-**

1) डॉ. अतुल नौबदे, महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक निम्न असल्याची कारणमिमांसा (विशेष संदर्भ मराठवाडा विभाग), यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती 1 जून 2021.

2) महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2012 : सर्वसमावेशक मानव विकासाकडे, निर्मिती - यशदा, पुणे.

3) http://mahasdb.maharashtra.gov.in Dt. 14.03.2022